लोकमत

# 'शिवाजी युनिव्हर्सिटी फिल्म क्लब' स्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठामधील वृत्तपत्रविद्या आणि मास कम्युनिकेशन विभागात 'शिवाजी युनिव्हर्सिटी फिल्म क्लब'ची स्थापना करण्याच्या प्रस्तावास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिली.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत, सदस्य सचिव म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी बैठकीचे कामकाज पाहिले.

बैठकीत विद्यापीठ अधिविभाग संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थिनींना एस. टी. व बस पास



योजना आणि अधिकची स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दानशूर व्यक्ती व उद्योजक यांच्याकडून निधी स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून शासनाचे इरादपत्र प्राप्त होण्याकरिता नवीन महाविद्यालय (व्यावसायिक), (पारंपरिक) व (कौशल्यावर आधारित) या प्रकारांतील प्राप्त प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली. सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मान्य करण्याबाबत अधिसभेस शिफारस करण्यात मान्यता देण्यात आली. दिनांक २० नोव्हेंबरला झालेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्या बैठकीत सामंजस्य करार करण्याबाबतचा कार्यवृत्तांत मान्य करण्यात आला. यासह खंडाळा येथील राजेंद्र महाविद्यालयाच्या नावात 'सुशीला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा' असा बदल करण्यास मान्यता दिली. वाळवा एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर या संस्थेच्या यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या नावात 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालय' असा बदल करण्यात आला. बैठकीस सदस्य उपस्थित होते.